# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(formerly University of Pune)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ९९(क)(४)(ख)[99A(4)(b)] नुसार विद्यापीठ विद्यार्थी परिषद सभापती आणि सचिव पदाची निवडणूक.**

## जाहिर प्रकटन

निवडणूक सूचना क्रमांक साफुपुविनि/९९(क)(४)(ख)/४०५ दिनांक ११.०१.२०१८ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ९९(क)(४)(ख)[99A(4)(b)] अन्वये विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवरील सभापती एक आणि एक सचिव पदाच्या विद्यार्थी परिषदेवरील निवडणुकीसाठी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी विद्यापीठ कार्यालयात सोमवार, दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी करण्यात आली. उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर ज्यांचे उमेदवारी अर्ज ग्राहय (वैध) ठरले आहेत, तसेच उमेदवारांची उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम तारखेनंतरची (सायंकाळी ५.०० वा.) नावे व पत्ते दर्शविणारी अंतिम उमेदवार यादी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे आहे.

१) उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त असल्यामुळे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवरील सभापती व सचिव यांना निवडून देण्यासाठी दि. ११ जानेवारी, २०१८ च्या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे सेट अतिथी गृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ या मतदान केंद्रावर ही निवडणूक गुरुवार, दि. १ फेब्रुवारी, २०१८ रोजी, दुपारी ३.०० ते ३.३० या वेळेत होईल.

२) मतदाराने मतदानास येताना स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र, उदा. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ विभागाने निर्गमित केलेले वैध फोटोसहित ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स), किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिकाऱ्यांनी (इन्कम टॅक्स) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (पॅन कार्ड) किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका-यांना वरीलपैकी एक ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.

३) मतदान केंद्रात जे मतदार दुपारी ३.३० नंतर येतील त्यांना मतपत्रिका देण्यात येणार नाही.

४) गुरुवार, दि. १ फेब्रुवारी, २०१८ रोजी, दुपारी ३.३० वाजता, मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच सेट अतिथी गृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ येथे मतमोजणीस सुरुवात होईल व मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल, मतमोजणीच्या वेळी उमेदवार स्वतः किंवा उमेदवाराने लेखी अधिकार पत्र दिलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेला त्याचा प्रतिनिधी किमान एक तास अगोदर पूर्व सूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

AS 25.1.18

संदर्भ क्र. : साफुपुविनि/ ४६४
दिनांक : २५/०१/२०१८

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

**प्रत** : सर्व संबंधित.

D:\Election 2017\Students Council Representatives\Notifiacation Vaild & Invalid Nominations Students Council.docx

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
(formerly University of Pune)

जाहिर प्रकटन जा. क्र. साफुपुविनि/ ४६४, दिनांक २५/०१/२०१८

**परिशिष्ट - 'अ'**

**विद्यापीठ विद्यार्थी परिषद : सभापती पदासाठीचे अंतिम उमेदवार.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १. | जाधव दिपाली संजय | प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कोल्हार, ता. राहता, जि. अहमदनगर. |
| २. | पारगे ग्रेस जॉर्ज | अशोका एज्युकेशन फाऊंडेशन अशोका कॉलेज ऑफ एज्युकेशन, सर्व्हे ८ब२. |

**विद्यापीठ विद्यार्थी परिषद : सचिव पदासाठीचे अंतिम उमेदवार.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १. | भटाटे स्वप्ना भोरु | मराठा विद्या प्रसारक समाज के.पी.जी. आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, इंगतपूरी. |
| २. | पारगे ग्रेस जॉर्ज | अशोका एज्युकेशन फाऊंडेशन अशोका कॉलेज ऑफ एज्युकेशन, सर्व्हे ८ब२. |

AS
25/1/18
(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

D:\Election 2017\Students Council Representatives\Notifiacation Vaild & Invalid Nominations Students Council.docx